# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/०९/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २७/०९/२००५ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. २०/०९/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ११) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १२) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १३) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १४) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११७ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

सभापती निवडणुकींचा कार्यक्रम जाहिर केला होता. त्याप्रमाणे २२/०९/२००५ रोजी सकाळी ११.०० ते ०१.०० या वेळेत नामनिर्देशन दाखल करायची होती. दरम्यानच्या काळात पाच सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. ती अनुक्रमे, (१) श्री. जयंत महादेव पाटील, (२) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे, (३) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील, (४) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील, (५) श्री. भोईज गजानन लक्ष्मण. दिनांक २३/०९/२००५, शुक्रवार रोजी ११.०० ते १२.०० या वेळेत छाननी होती. छाननीमध्ये सगळे अर्ज वैध ठरले होते. दिनांक २६/०९/२००५ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत उमेदवारी मागे घ्यायचे, पण कोणीही उमेदवारी अर्ज त्यावेळी मागे घेतले नाही. दिनांक २७/०९/२००५ रोजी निवडणुक प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी आलेले पाच अर्ज पिठासिन अधिकारी ह्यांच्याकडे दाखल करत आहे. दरम्यानच्या काळात तीन सदस्यांनी आपले अर्ज माघारीसाठी माझ्याकडे दिलेले आहे. ते अर्ज अनुक्रमे, (१) श्री. जयंत महादेव पाटील, (२) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील, (३) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील असे तीन अर्ज माघारी आलेले आहेत. पाच सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे भरली होती. त्यापैकी तीन उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे दोन सदस्य निवडणुक प्रक्रियेकरिता शिल्लक राहिलेले आहेत. ते अनुक्रमे, (१) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे, (२) श्री. गजानन लक्ष्मण भोईर असे दोन अर्ज आहेत. पिठासिन अधिकारी ह्यांना माघारी आलेले अर्ज दिलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

सचिव साहेब, आता जे सभापती निवडून येतील त्यांचा कालावधी आजपासून चालू होईल.

**प्र. सचिव :-**

आजपासून सुरु होईल व पुढच्या ३१ ऑगस्ट, २००५ पर्यंत असा एक वर्षाचा कालावधी राहणार आहे.

**जयंत पाटील :-**

आता जे पिठासिन अधिकारी म्हणून सभापती आहेत, त्यांचा कालावधी आज संपतो. त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करायचा आहे.

**प्र. सचिव :-**

निवडणुक प्रक्रिया जी आहे ती पुर्ण होऊ द्या. त्यानंतर ठराव मांडा.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे.

**प्र. सचिव :-**

दोन सदस्य असल्यामुळे निवडणुक घेणे क्रमप्राप्त आहे. निवडणुक प्रक्रिया ही नवीन पद्धतींप्रमाणे सर्व सदस्यांनी ज्याच्या बाजुने मतदान करायचे आहे, त्यांच्या बाजूने हात वर करुन मतदान करायचे आहे. पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने मतदान प्रक्रियेला सुरुवात करत आहे. पिठासीन अधिकारी ह्यांच्या परवानगीने, अजुन कोणाला उमेदवारी अर्ज मागे घ्यायचे असेल तर पाच मिनिटाचा अवधी देण्यांत येत आहे.

**मा. पिठासिन अधिकारी :-**

दिलेली वेळ पुर्ण झालेली आहे आणि सचिवांना निर्देश देतो की, इलेक्शन प्रक्रिया सुरु करावी आणि इलेक्शन प्रक्रिया सुरु करताना हात वर करुन मतदान करायचे आहे. जागेवर बसून हात उंच करावा.

**प्र. सचिव :-**

सर्व सदस्यांना सुचना आहे, उमेदवारी अर्ज दोन आहेत, (१) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे, (२) श्री. गजानन लक्ष्मण भोईर. अनुक्रमे श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे ह्यांचे नांव आहे व दुसऱ्या क्रमांकावर श्री. गजानन भोईर ह्यांचे नांव आहे. प्रथम श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे ह्यांच्या बाजून जे सदस्य आहेत त्यांनी हात वर करावे. श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे ह्यांच्या बाजूने हात वर करुन मतदान घेतले असता खालीलप्रमाणे सदस्यांनी हात वर केले.

१) श्री. मोहन मधुकर पाटील
२) श्री. जयंत महादेव पाटील
३) श्री. मिलन गोविंदराव पाटील
४) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
५) श्री. केशव रामभाऊ घरत
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
८) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे
९) श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील
१०) श्री. शफिक अहमद खान
११) श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो
१२) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस

(श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे ह्यांच्या बाजूने हात वर करुन मतदान घेतले असता त्यांना १२ इतकी मते मिळाली.)

**प्र. सचिव :-**

श्री. गजानन लक्ष्मण भोईर ह्यांच्या बाजुने जे आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. श्री. गजानन लक्ष्मण भोईर ह्यांच्या बाजूने हात वर करुन मतदान घेतले असता खालीलप्रमाणे सदस्यांनी हात वर केले.

१) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
२) श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र
३) श्री. रमेश धरमचंद्र जैन
४) श्री. रतन कृष्णा पाटील

(श्री. गजानन लक्ष्मण भोईर ह्यांच्या बाजूने हात वर करुन मतदान घेतले असता त्यांना ०४ इतकी मते मिळाली.)

**प्र. सचिव :-**

पिठासिन अधिकारी निकाल घोषित करीत आहेत.

(मा. पिठासिन अधिकारी सो. ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ११७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००५-०६ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. १२३ :-**

प्रकरण क्रमांक ११७ पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००५-२००६ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणूक करावयाची आहे.

या नेमणूकीसाठी नामनिर्देशन पत्र मागविली असतां,

१) श्री. जयंत महादेव पाटील
२) श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे
३) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
४) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
५) श्री. भोईर गजानन लक्ष्मण

यांनी त्यांची नामनिर्देशनपत्रे दाखल केली.

वरील पाच उमेदवारांपैकी तीन उमेदवार १) श्री. जयंत महादेव पाटील, २) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील व ३) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील यांनी आज दिनांक २७/०९/२००५ रोजी स्थायी समितीच्या सभेत निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर आपली उमेदवारी मागे घेतल्याने दोन उमेदवार १) श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे व २) श्री. भोईर गजानन लक्ष्मण हे शिल्लक राहिले आहेत. सभापती पद एकच असल्याने निवडणुक घेणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार सभापती, स्थायी समिती या पदाकरिता हात वर करुन मतदांन घेण्यांत आले.

त्यावेळी १) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे यांना १२ इतकी मते आणि २) श्री. भोईर गजानन लक्ष्मण यांना ०४ इतकी मते मिळाली. पैकी श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे यांना सर्वाधिक १२ मते मिळाली असून ते विजयी झालेले आहेत.

तरी श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे यांची सन २००५-०६ सालाकरीता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या चतुर्थ स्थायी समितीच्या सभापती पदी आपण सर्वांनी हात उंच करुन मतदान करुन सन्मा. श्री. तुळशीदास म्हात्रेजी ह्यांची सभापती पदी निवड केल्याबद्दल मी सर्व स्थायी समितीच्या सदस्यांचे हार्दिक अभिनंदन करतो व आभार व्यक्त करतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासामध्ये अतिशय महत्त्वाची अशी स्थायी समिती ही असते आणि या स्थायी समितीद्वारे मा. महासभेने दिलेल्या निदेशाप्रमाणे सर्व शहराच्या विकासामध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपले बहुमूल्य विचार मांडून आपण त्या विकासाच्या दिशेने वाटचाल करत असतो आणि त्या पद्धतीने गेल्या तीन वर्षामध्ये ज्या पद्धतीने शहराचा विकास झाला, त्या विकासामध्ये जी भरीव कामे आपण केली आणि ह्याकरिता गेल्या तीन वर्षामध्ये सर्व स्थायी समिती सदस्यांनी, जे सदस्य मावळते होते व जे सदस्य नव्याने या ठिकाणी आले, त्यांचेही मी स्वागत करतो आणि मला ज्या पद्धतीने सदस्यांनी सहकार्य केले, ह्या स्थायी समितीद्वारे त्यांचेही अभिनंदन करतो आणि नविन आलेले सदस्य व जे मुळ सदस्य या ठिकाणी आहेत, त्या दोघांना नम्र निवेदन करतो की, नविन सदस्यांनी महिनाभर जे सहकार्य केले, त्यांना मी धन्यवाद देतो. कारण वेळोवेळी कोणत्याही प्रश्नावर, ज्या प्रश्नामध्ये जातीने लक्ष घालणे व ते प्रश्न सोडवत असताना त्यामध्ये कायदेशिर बाबींचा जो निकष लावला जातो त्याच्यावर जरुर मतभेद झालेले आहेत आणि त्या मतभेदातून चांगले विकासकामे आपण करु शकलो. त्यासाठी नविन सभापती साहेबांना आपण चांगल्या पद्धतीने सहकार्य कराल, अशी मी अपेक्षा बाळगतो व आपण आम्हांला चांगल्या पद्धतीने जे सहकार्य दिले, त्याबद्दल पुन्हा आपले अभिनंदन करतो आणि असे सांगू इच्छितो की, मा. महासभेने प्रस्ताव मंजुर केल्यानंतर त्याचे इंम्प्लीमेंन्टेशन करणे ही आपली नैतिकता असते. त्यामध्ये कायद्याच्या वारंवार ज्या अडचणी निर्माण होतात त्या अडचणी निर्माण होत असतांना सदस्यांनी काही वेळी आपले प्रखर विचार ह्या ठिकाणी मांडले आणि त्या प्रखर विचारांवर बरेचसे मतभेद निर्माण झाले. परंतु, ते मतभेद बाजूला ठेवून आपण त्या विचारांची एक जुळवणी करुन ते विचार एकत्र आणून आपण विकासाच्या

कामाला गतीमान बनवले व मिरा भाईंदर शहराचा विकास गतीमान केला आणि असाच विकास करण्याच्या दृष्टीकोनातून आपण जे सहकार्य केले, त्याबद्दल मी पुनःश्च आपले आभार व्यक्त करतो आणि पुढील ह्या स्थायी समितीमध्ये मी सदस्य या नात्याने आपल्या सर्वांच्या बरोबर राहून काम करु इच्छेन. त्यासाठी आपले सहकार्य आपण पुन्हा आम्हांला द्याल अशी अपेक्षा बाळगतो आणि नविन सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे ह्यांची निवड झालेली आहे असे मी जाहिर केलेले आहे. त्यांचा पदभार मी त्यांना प्रदान करीत आहे. त्यांनी तो स्विकारावा असे त्यांना नम्र निवेदन करतो!

(श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे ह्यांनी सभापती पदाचा कार्यभार स्विकारला.)

**जयंत पाटील :-**

स्थायी समितीच्या सभापती पदी आरुढ झालेले आमचे नेते सन्मा. श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब व आजच काही मिनिटांपुर्वी माजी झाले, ते आमचे मित्र श्री. मोहन पाटील साहेब, सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सचिव साहेब, असे म्हणतात की, नेहमी सुखी माणसाचा सदरा घालावा म्हणजे त्या व्यक्तीला जो सदरा घालतो त्याला सुख मिळते. मी अपेक्षा करत होतो की, श्री. मोहन पाटील त्यांचा सदरा मला देतील व मी कधीतरी सुखी होईन. ज्यांनी तीन वर्षामध्ये दोनदा सभापती पद मिळवले अशी कर्तबगारी एखाद्या व्यक्तीमध्ये असते म्हणून ते मिळते. राजकारणामध्ये ह्या साध्या गोष्टी नसतात, असे हे मोहन पाटील, मी स्थायी समितीमध्ये प्रथमच स्थायी समिती सदस्य म्हणून आलो. त्यामुळे त्यांचा काही मोठा अनुभव मला स्थायी समितीमध्ये आलेला नाही. फक्त मी एकच सभा अटेंन्ड केली आहे. परंतु, मा. महासभेमध्ये त्यांचे वक्तव्य आणि स्थायी समितीचे त्यांनी दोन वेळा केलेला अर्थसंकल्प, त्याच्याबद्दल जेव्हा मी अभ्यास केला तेव्हा त्यांच्यातले कतृत्व मला निश्चितच जाणवले. मिरा भाईंदर महानगरपालिकेची सव्वा दोनशे ते अडीचशे करोड बजेटचे नियोजन जेव्हा सभापती आणि स्थायी समिती करते व त्यांचे नेतृत्व जेव्हा सभापती करतात आणि त्यांनी अर्थ संकल्पामध्ये केलेल्या तरतुदी वाचल्यानंतर निश्चितच त्यांच्या बुद्धीची चुणूक त्याच्यामध्ये दिसते. त्यांना जो यशस्वी कालावधी दोन टर्ममध्ये केला, कारण मागचे टर्म संपलेले आहे. त्याबद्दल माझे जुने सहकारी, माझे जुने मित्र आणि सभापती म्हणून ते निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. पुनःश्च त्यांना निश्चितच एखादे चांगले पद मिळेल व ह्या शहराची आमदारकी सुद्धा वेगळी झालेली आहे. मोहन पाटील ह्यांचे लक्ष तिथे असायला पाहिजे. त्यांनी लक्ष ठेवायला पाहिजे. त्या दृष्टीने पाऊल उचलायला पाहिजे. त्यांचा भविष्यकाळ यशस्वी होवो यासाठी त्यांना आर्थिक शुभेच्छा देतो आणि आपल्या सर्वांच्या वतीने त्यांचा मागचा काळ यशस्वी झाला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

**मिलन पाटील :-**

अध्यक्षांच्या परवानगीने बोलातोय. प्रथम आमचे जुने स्नेही आणि जुने जाणते सहकारी, आम्ही त्यांच्याबरोबर एकत्र असे काम केलेले आहे. तुळशीदास म्हात्रे साहेब, हे आज स्थायी समिती सभापती झाल्याबद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो आणि आमचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसतर्फेही मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. तसेच त्यांचा हा एक वर्षाचा काळ यशस्वी आणि चांगला जावो आणि त्यांना पहिल्यापासूनच गावाची काळजी आहे, शहराची काळजी त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या ह्या काळामध्ये या शहराची उन्नती होवो, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि ईश्वर त्यांना ह्या उन्नतीकरिता सद्बुद्धी देवो, अशी पुन्हा ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि आमचे निवृत्त, जेष्ठ असे अध्यक्ष मोहनजी पाटील ह्यांनी गेले दोन वर्ष हे पद सांभाळले. परंतु, त्यांच्या काळामध्ये मला एक वर्षच त्यांचा सहवास मिळाला. त्यांनीसुद्धा गावाकरिता, या शहराकरिता तळमळीने खुप कार्यक्रम घेऊन आणि ह्या गावाची उन्नती कशी होईल असा त्यांचा कल होता. तसेच गिल्बर्ट मेंन्डोंसाजी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी खुप काही कार्यक्रम केले. या शहराची उन्नती केली. त्याचप्रमाणे सर्व अधिका-यांना व आम्हांला सांभाळून घेऊन, कोणाशी वादविवाद न करता, जर कुठल्याही अधिका-यावर सभासदांनी आकांडतांडव केले तर ते त्या दोघांनाही सांभाळून घेऊन त्यांनी त्यांच्या एक वर्षाचा कालावधी पुर्ण केला आहे व जे बजेट आहे ते त्यांनी गावाच्या, शहराच्या विकासाकरिता त्यानी जास्तीत जास्त बजेट म्हणजे जी उत्पन्नाची बाजू आहे, ती खरोखर चांगल्या शोधून काढलेल्या आहेत आणि त्यांनी चांगले बजेट सादर केलेले आहे आणि ते बजेटसुद्धा त्यांच्या प्रयत्नाने वीस करोड रुपये जकातीमध्ये जास्त आलेले आहेत, ही चांगली गोष्ट आहे. त्यांना आम्ही सहकार्यसुद्धा केलेले आहे. असे कधीतरी शाब्दिक वाद व्हायचे. परंतु, ते पुन्हा आम्हांला सांभाळून घेऊन सर्व सभासदांना सांभाळून घेऊन, अधिका-यांना सांभाळून घेऊन दोघांच्या मध्ये समन्वय साधुन त्यांनी जे ठराव केलेले आहेत व आम्हाला सागितले, शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातून ते ठराव केलेले आहेत, ठराव पास केले व ठरावाची अंमलबजावणी करुनसुद्धा त्यांनी मा. महासभेमध्ये स्थायी समितीचा एकसुद्धा ठराव फेटाळलेला नाही, ही त्यांची मोठी कसब आहे. मा. महासभेमध्येसुद्धा त्यांनी हे ठराव पास करुन घेऊन, ठरावाची अंमलबजावणी केलेली आहे. शहराच्या दृष्टीकोनातून त्यांनी चांगले काम केलेले आहे. परमेश्वर त्यांना ह्या शहराची सेवा करण्याची संधी आणखीन देवो, जास्त देवो ही परमेश्वराच्या चरणी मी प्रार्थना करुन माझे दोन शब्द पुर्ण करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

**रतन पाटील :-**

आजच्या ह्या सभापती निवडणुकीच्या संदर्भात नवनिर्वाचित मा. तुळशीदासजी म्हात्रे ह्यांची २००५-०६ या कार्यकालासाठी सभापती म्हणून बहुमताने निवडून आले. मी प्रथम त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो. त्यांचा पुढील कार्यकाल यशस्वी होवो. विरोधकांना जोडीला घेऊन, या मिरा भाईंदर शहराचा विकास करावा अशी मी त्यांच्याकडे विनंती करतो. कारण विरोधकांना फक्त विरोधक म्हणू नका. आपल्याकडून कुठेतरी सत्तेच्या कामामध्ये चुका होऊ नये, त्याला लगाम घालावा म्हणून विरोधक असतात. त्यांचेसुद्धा विचार ऐकून घ्या आणि तशा प्रवाहामध्ये आपण आम्हांला जोडीला घेऊन, या मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी आपण पुढे पुढे चला. त्याबाबत विरोधक आपल्याला नेहमी सहकार्य करतील. आपल्या पुढील यशस्वी काळासाठी मी आई जगदंबेच्या चरणी प्रार्थना करतो की, आपल्याला पुढील कार्यासाठी शुभेच्छा व सुयश लाभो. तसेच, माजी सभापती ह्यांच्या उर्वरित काळासाठी त्यांनासुद्धा शुभेच्छा प्रदान करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

**गजानन भोईर :-**

आजच्या ह्या निवडणुकीमध्ये निवडून आलेले आमचे सहकारी श्री. तुळशीदासजी म्हात्रे, ह्यांना तसा कामाचा चांगला अनुभव आहे. कारण ग्रामपंचायत असतांना त्यांनी भाईंदरचा कारभार हा व्यवस्थित चालवला होता. जुने कार्यकर्ते आहेत, हे नक्कीच शहराचे चांगले हित बघतील. त्यांना शुभेच्छा देतो. आत्ताच गणपती सण हा गेला. आमचे मित्र मोहन पाटील, त्यांनी आम्हांला एक वर्षात चांगले सहकार्य केले. खरं तर त्यांचा निरोप समारंभ करायला पाहिजे होता. पण तो आपल्याला करता येणार नाही. कारण तेही एक वर्ष आपल्यासोबत स्थायी समितीच्या सभेत सदस्य म्हणून असणार आहे. त्यांनी जे आम्हांला सहकार्य केले. मिळून मिसळून जे काही निर्णय घ्यायचे आहेत ते घेतले. नविन आलेले सभापती ह्यांच्या पुढील कार्यास आमच्या शुभेच्छा. त्यांना परमेश्वर चांगली बुद्धी देवो. एवढेच बोलून मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

**मोहन पाटील :-**

स्थायी समिती सभापती ह्यांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मघाशी सन्मा. सदस्य जयंत पाटीलजी, मिलन पाटीलजी, रतन पाटीलजी व गजानन भोईरजी ह्यांनी माझ्या मागच्या कारकिर्दीबद्दल ज्या शुभेच्छा दिल्या, त्याबद्दल मी आपला खरोखर ऋणी आहे. परंतु, मी एकच सांगू इच्छितो की, कोणतेही काम करतांना हे सहकार्याशिवाय होऊ शकत नाही. संपुर्ण स्थायी समितीचे सहकार्य होते म्हणून आज २९८ कोटीमध्ये २० कोटी रुपये बजेटमध्ये रेव्हेन्यु वाढवू शकलो. हे संपुर्ण आपले सहकार्य मिळाले म्हणू झाले. तसेच, या शहराची सेवा करत असतांना आपण जेव्हा या शहरामध्ये सेवा करतो, तेव्हा आपले सर्व सन्मा. सदस्य, सहकारी हे आपल्याबरोबर एकत्र असतात. आपल्या विचारांची देवाण-घेवाण करतात. म्हणून आपण त्या सहकार्याच्या जोरावर विकास काम करु शकतो. दादा आपण मला आदरणीय आहात. माझ्यापेक्षा मोठे आहात. तरी आपण आमचे दादा आहात आणि त्या दृष्टीकोनातून दादा बोलले तरी दादागिरी आपण मागच्या काळामध्ये केलेली आहे, सेवेमध्ये एकत्र राहून, आम्ही त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि चांगल्या कामाला तुमची दादागिरी कायमची राहील व राहो, ही सदिच्छा व्यक्त करतो. जेव्हा चांगल्या कामाला प्रतिकार करण्याची वेळ येईल, त्यावेळी आपल्या दादागिरीला आम्ही आपल्या बरोबर राहू आणि दादागिरी करुन तो प्रतिकार संपुष्टात आणू. परंतु, मी एकच सन्मा. सदस्यांना सांगेन, मघाशी विरोधक म्हणून सन्मा. सदस्य श्री. रतन पाटीलजी बोलले. पण मी नेहमी मा. महासभेतही बोलतो की, सहकारी पक्ष, मित्रपक्ष जरी बोलले नाही तरी सहकारी पक्ष म्हणून आम्ही जरुर बोलतो. आपण सहकारी पक्षाची भूमिका बजावत आलेला आहात आणि जरुर त्या बजावाल अशी आपल्याकडून अपेक्षा आहे आणि हे सर्व काम करत असतांना मला माझे या ठिकाणी गुरुतुल्य, पितृतुल्य असे आदरणीय गिल्बर्ट शेठ ह्यांचे मला पुर्ण सहकार्य व पुर्ण पाठिंबा आणि त्यांचे प्रेम हे मला नेहमी मिळत गेले. त्यामुळे आज जे माझ्या आमदारकीचे सुयश चिंतले, त्याबद्दल आपल्याला अतिशय धन्यवाद करेन. कारण राजकारणामध्ये कोणते योग आहे, हा राजकीय योग असावा लागतो आणि त्याच्या दुप्पटीच्या सहकार्याच्या जोराने असावा लागतो. येथे सहकार्य, सहकार्य पक्षाचे असावे लागते, सत्ताधारी पक्षाचे असू शकते आणि असावे लागते. म्हणून मला आदरणीय गिल्बट शेठ ह्यांचा हा विजय आहे व त्यांचा खऱ्या अर्थाने सत्कार आहे, असे मला नमूद करायचे आहे. धन्यवाद!

**प्र. सचिव :-**

नवघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच, नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष व सभापती पदाचा कार्यभार स्विकारणारे मा. तुळशीदासजी म्हात्रे ह्यांना प्रशासनातर्फे व सचिव विभागातर्फे हार्दिक शुभेच्छा. तसेच, त्यांना त्यांच्या पुढील कामाकरिता व नित्याच्या स्थायी समिती सभेकरिता प्रशासनातर्फे आम्ही योग्य ते सहकार्य करु अशी ग्वाही देतो. तसेच, माजी सभापती ह्यांनादेखील पुढील कालावधीसाठी प्रशासनातर्फे हार्दिक शुभेच्छा.

**तुळशीदास म्हात्रे (मा. सभापती) :-**

स्थायी समितीचे माजी सभापती मा. मोहन पाटील, त्याचप्रमाणे सर्व स्थायी समिती सदस्य/सदस्या व विरोध पक्षाचे सदस्य, आत्ताच सन्मा. श्री. मोहन पाटील ह्यांनी सांगितले की, आपण विरोधी पक्षाचे सदस्य

नसून सहकारी सदस्य आहात. आपण एकमेकांना सहकार्य करायचे आहे आणि ज्याप्रमाणे सचिव व श्री. गोखले हेसुद्धा आपल्याला सहकार्य करणार व ते त्यांचे कर्तव्य आहे. चांगल्याप्रमाणे त्यांनी आपल्याला सहकार्य करावे. त्याचप्रमाणे सर्व सदस्यांनी हे लक्षात ठेवायचे आहे, जो शहराच्या विकासाचा प्रश्न असेल तिथे आपण एकजुटीने राहिले पाहिजे आणि त्या दृष्टीने शहराचा विकास करण्याकरिता एकतर्फी राहिले पाहिजे. जेणेकरुन हा विकास करतांना आपल्याला माहिती आहे, शहर झपाट्याने वाढत आहे. आपण पुढील योजनासुद्धा शहराकरिता आखल्या पाहिजे. अशा प्रकारे आपण शहराचा विकास करतांना सर्व सदस्यांनी सहकार्य करा. जे काय चुकले तर माणूस आहे आणि माणसाला चुकी करण्याचा अधिकार आहे आणि चुकी सुधारण्याचा अधिकारदेखील परमेश्वराने मानवाला दिलेला आहे. अशा तऱ्हेने ज्या चुका होत असतील त्या सुधारणा करण्याकरिता आपण आम्हांला सहकार्य करा. मी तुमच्याकडून मोठी सहकार्याची अपेक्षा करतो आणि पुढील कारभार म्हणजे ही जबाबदारी दिलेली आहे. परमेश्वराने आपल्या सर्वांना, मलासुद्धा चांगली बुद्धी द्यावी आणि हा जो कारभार आपण हातात ते चांगले कसे करता येईल, अशा तऱ्हेने मला परमेश्वराने सहकार्य करावे, हिम्मत दिली व निश्चितपणे हा कारभार केला जाईल, ह्यात शंका नाही. कारण आपल्याला माहित आहे आणि आपण एवढे वर्ष एकत्र कारभार करतो आणि हा कारभार करत असतांना माझे सहकारी राष्ट्रवादी पक्षाचे मॅन ऑफ द मॅच गिल्बर्ट मेंन्डोंसा साहेब त्याचप्रमाणे त्यांचे सर्व सहकारी व आमचे कॉंग्रेसचे सर्व सदस्य, कॉंग्रेसच्या अध्यक्षा आणि आपण सर्व सहकारी, मला या पदासाठी अपण सर्वांनी मला एकमताने निवडून दिल्याबद्दल मी आपला ऋणी राहीन व आपले ऋण फेडायचे काम मी निश्चितपणे करेन. मी एवढेच ह्या ठिकाणी सांगू इच्छितो आणि माझे दोन शब्द पुर्ण करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

**मा. पिठासिन अधिकारी :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.४० वा.**

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**